सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र. ८८/२०२२/२१ दिनांक : २७ सप्टेंबर, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:**- विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/ अथवा अनुभवावर आधारित चाळणी परीक्षेच्या निकालाबाबत.

**संदर्भ:**-जाहिरात क्रमांक- ०७४/२०२२, ०३०/२०२३.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित संगणक प्रणालीवर आधारित खालील चाळणी परीक्षांचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | जाहिरात दिनांक | संवर्ग | परीक्षा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ०७४/२०२२ | २९ जुलै,२०२२ | तालुका क्रीडा अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब [शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील] | २९ ऑगस्ट,२०२३ |
| २ | ०३०/२०२३ | १९ मे,२०२३ | तालुका क्रीडा अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब [शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील] | २९ ऑगस्ट,२०२३ |

२. तालुका क्रीडा अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब, (जा.क्र.०७४/२०२२) या पदाची जाहिरात दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. यास्तव महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/ प्र. क्र. १२३ / कार्या -२, दिनांक ०४ मे, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या शासननिर्णयातील खुला महिला प्रवर्ग आरक्षणाकरीता नॉन क्रीमीलेअर (NCL) प्रमाणपत्राबाबतची तरतुद या जाहिरातीतील पदांकरीता लागु करण्यात आलेली नाही.

३. प्रस्तुत निकालानुसार प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता तपासल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. जाहिरातीमधील तरतुदीनुसार विविध दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

उपसचिव
परीक्षा राजपत्रित
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- नवी मुंबई